चार

# मोहम्मद–बिन–तुघलक

## (इ. स. १३२५ ते इ. स. १३५१)

**तुघलक घराण्याचा संस्थापक**

**पूर्ववृत्तांत :** ग्यासुउद्दीन तुघलकाच्या मृत्यूनंतर त्याचा मोठा मुलगा फकरुद्दीन जुनाखान उर्फ उलुघखान हा 'मोहम्मद–बिन-तुघलक' या नावाने इ. स. १३२५ मध्ये गादीवर बसला. त्यास अवगत नव्हते असे एकही शास्त्र नव्हते, तसेच त्यास येत नव्हती अशी एकही कला नव्हती, तो उत्तम लेखक व उत्कृष्ट वक्ता होता, गणित, वैद्यक, युद्धकला व राज्यकारभाराची त्यास उत्तम माहिती होती, त्याच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकताना त्याचे चरित्र-लेखक डॉ. ईश्वरीप्रसाद लिहितात– "दिल्ली सुलतानात तो सर्वाधिक विद्वान व योग्य पुरुष होता, त्याची स्मरणशक्ती आणि बुद्धी अलौकिक होती, तत्कालीन विद्या व कलांचा तो ज्ञाता होता, तर्कशास्त्राचा तो महापंडित होता. या शास्त्रातील प्रकांड पंडितसुद्धा त्याच्याशी वादविवाद करण्यास कचरत असत," नासिरुद्दीन खुसरोच्या कारकीर्दीत त्याने अमीर–ए–आखूरच्या पदावर कार्य केले होते, खुसरोविरुद्ध सरदारांचा उठाव करून त्याच्या जागी पित्याला गादीवर बसविण्यात मोहम्मद तुघलकाने प्रामुख्याने भाग घेतला होता, गादीवर आल्यानंतर सुलतानाने त्याला आपला भावी वारस नेमून 'उलूघखान' ही पदवी दिली, ग्यासुद्दीनाच्या कारकीर्दीत त्याने वारंगळ आणि ओरिसा हे प्रदेश जिंकून कीर्ती संपादन केली होती.

> सुलतान मोहम्मद–बिन–तुघलक
> (१३२५–५१)
> पुर्ववृत्तांत,
> मोहम्मद पितृघातक होता का ?
> मोहम्मद तुघलकाचे राज्यारोहण
> (इ. स. १३२५)
> मोहम्मदाचे शासनव्यवस्थेतील अभिनव प्रयोग–
> १. दुआबातील करवाढ
> (इ. स. १३२६)
> २. आदर्श कृषी–योजना
> ३. राजधानी परिवर्तन
> (१३२६–१३२७)
> ४. प्रतीकमुद्रा प्रचलन
> (इ. स. १३२९–३२)
> ५. खुरासान व चीनवरील स्वाऱ्या ?



**मोहम्मद पितृघातक होता का ? :** आधुनिक इतिहासकार डॉ. ईश्वरीप्रसाद व बूल्जले हेग हे मोहम्मदावर पितृहत्येचा आरोप लावतात. मूलतः हा आरोप तत्कालीन मोरोक्कन प्रवासी इब्न–बतूता याने आपल्या 'किताब-उल्–रहला' या ग्रंथात केला आहे. सुलतान ग्यासुद्दीन बंगाल विजय संपादून परत दिल्लीस येत असताना मोहम्मदाने त्याचे स्वागत करण्याकरिता अफगाणपूर येथे अहमद अयाजकडून एक लाकडी इमारत तयार करविली. या इमारतीत मुद्दाम अशी सोय ठेवण्यात आली होती की, एका विशिष्ट ठिकाणी धक्का लागला असता सर्व इमारत कोसळून पडावी. संध्यासमयी पित्याचे मनोरंजन करण्याकरिता मोहम्मदाने हत्तीच्या खेळांचे प्रदर्शन करण्याचा देखावा केला. त्यातीलच एका हत्तीच्या धक्क्याने सर्व इमारत कोसळून ग्यासुद्दीन त्याखाली चेंगरून मेला. या घटनेसंबंधी मोहम्मदाच्या समकालीन तारीख ए–फिरोजशाहीचा लेखक जियाउद्दीन बर्नी म्हणतो, एके दिवशी "आकाशातून वीज पडली आणि त्यामुळे सुलतानाचे देहावसान झाले" (सायक: बल अज आसमाँ जमी नाजिल शुद) मतलू-बुल–तालिबीनचा लेखकही बर्नीप्रमाणेच सुलतानाचा मृत्यू वीज पडण्याने झाला असे म्हणतो. त्याच्या मतानुसार ही घटना 'रबीउल अव्वल' च्या महिन्यात झाली. हा महिना जून-जुलै मध्ये असतो. हे वर्षा ऋतूचे दिवस असतात व त्यावेळी आकाशातून वीज पडणे स्वाभाविक असते. आधुनिक इतिहासकारांपैकी डॉ. आग मेहदी हसन (The Rise and fall to Muhammed Bin Tughlug) हे या मताचे समर्थक आहेत. पण बुल्जले हेग व डॉ. ईश्वरीप्रसाद (A History of Quraunch Turks in India चे लेखक) हे इब्न बतूताच्या मताचे समर्थक आहेत. त्यांच्या मतानुसार "सत्य काहीही असो या विचाराला सिद्ध करणारे अनेक पुरावे उपलब्ध आहेत की, गयासुद्दीन तुघलक शहाचा मृत्यू आकस्मिक दुर्घटनेमुळे नव्हे तर एका सुनियोजित कारस्थानामुळे झाला होता व त्यात युवराजाचाही सहभाग होता." एकंदरीत ज्या परिस्थितीत ग्यासुद्दीनाचा मृत्यू झाला त्यामुळे असा संशय निर्माण होतो की, पित्याचा बध करण्याकरिताच मोहम्मदाने ही योजना आखली असावी.

**मोहम्मद तुघलकाचे राज्यारोहण (इ स. १३२५) :** ग्यासुद्दीनाच्या मृत्यूनंतर तीन दिवसांनी त्याचा मुलगा जूनाखाला (उलघखानाला) नवीन शासक घोषित करण्यात आले. पित्याच्या मृत्यूचा शोक प्रगट करण्यासाठी त्याने काळी वस्त्रे धारण केली व राज्यातही ४० दिवसपर्यंत शोक पाळण्याची आज्ञा करण्यात आली शोकपर्वाच्या समाप्तीनंतर मोहम्मदाने मोठ्या थोटामाटाने मिरवणुकीसह दिल्ली शहरात प्रवेश केला व तेथे सिंहासनारोहणाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. नवीन सुलतानाच्या स्वागतासाठी शहर पूर्णपणे शृंगारित करण्यात आले होते सुलतानाने लोकांवर सोन्याचे दीनार व चांदीच्या दिरहामचा वर्षाव केला.

राज्याभिषेकाच्या वेळी सुलतानाने अनेक आप्तेष्ट 'सहकारी, मित्र' राज्यकर्मचारी व विद्वानांना पदव्या, पेन्शने, बक्षीसे, सवलती व जहागिरींची खैरात केली. सोनारगावचा शासक तातारखाला १ कोटटंका, व 'बहरामखां' पदवी, मलिक संजर बदक्षानीला

८० लक्ष टंका, इमामुद्दीनाला ७० लाख टंका, मलिक मकबूलला-इमादुल मुल्क पदवी व वजीर-ए-मालिक पद, अफगानपूरच्या महालाची निर्मिती करणाऱ्या अहमद अयाजला 'ख्वाजाजहां' पदवी व वजीर पद तसेच चुलत भाऊ मलिक फिरोजला 'नायब बारबक' पद देण्यात आले. सुलतानाने आपला गुरु सैयद अजुद्दोलाला ४० लाख टंका व एक शिक्षक मौलाना कियामुद्दीनला कुतलुगखां पदवी व वकील ए-दर पद देण्यात आले. या खैरातीमुळे लोक सुलतानाच्या कृत्याकडे दुर्लक्ष करू लागले व त्यामुळे राज्याभिषेका-नंतर लवकरच त्याची स्थिती मजबूत झाली.

**मोहम्मदाचे शासनव्यवस्थेतील अभिनव प्रयोग :** मोहम्मद तुघलकास राज्यकार-भाराचे उत्तम ज्ञान होते. प्रचलित राज्यव्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याची त्यास अनिवार इच्छा होती. किंबहुना नवीन नवीन प्रयोग करण्याचा त्याला छंद होता. त्याने अनेक योजना अमलात आणल्या. त्या योजना पुढीलप्रमाणे आहेत—

(१) दुआब प्रांतात करवाढ.
(२) आदर्श कृषी-योजना.
(३) राजधानी परिवर्तन.
(४) प्रतीक-मुद्रा प्रचलन (Token Currency System)
(५) खुरासान व चीनवरील स्वाऱ्या.

**(१) दुआबातील करवाढ (इ. स. १३२६) :** राज्यारोहणानंतर सुलतानाने द्रव्य वाटण्याचा जो सपाटा सुरु केला त्यामुळे खजिना रिता झाला. ही तूट भरून काढण्या-साठी आणि राज्याचे उत्पन्न वाढविण्याकरिता मोहम्मदाने गंगा-यमुनेच्या प्रदेशातील सुपीकता लक्षात घेऊन तेथील शेतसारा ५% ते १०% ने वाढविण्याचा निश्चय केला. जियाउद्दीन बर्नीच्या मतानुसार सुलतानाने १० पट ते २० पट (यकेब दह् यकब विस्त) वाढविले. त्याचा दुसरा अर्थ १०% टक्के व ५% टक्के असाही होतो. शेतसाऱ्याव्यतिरिक्त घरे, पशू व कुरणावरही कर आकारण्यात आले. करवसुली सक्तीने करण्यात यावी अशी आज्ञा सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात आली होती. परंतु दुर्दैवाने याचवेळी दुआबात भयंकर दुष्काळ पडला. नैसर्गिक प्रकोप आणि सरकारी अधिकाऱ्यांची बेछूट वर्तणूक यामुळे रयत भडकली व तिने रौद्र स्वरूप धारण करून सुलतानाविरुद्ध बंड पुकारले. बंडाचा मोड करण्यात आला, परंतु सत्य परिस्थिती जेव्हा सुलतानास कळली तेव्हा त्याने दुष्काळग्रस्त प्रजेस यथाशक्ती साहाय्य करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. सरकारकडून रयतेस धान्य, कपडे व द्रव्य इ. वस्तू पुरविण्याची व्यवस्था करण्यात आली, त्याचप्रमाणे दुष्काळ-ग्रस्तांना काम मिळवून देण्याकरिता विहिरी, तलाव व कालवे इ. बांधकामे सुरू करण्यात आली. मोहम्मदाचा प्रजेस मदत करण्याचा हा प्रयत्न निश्चितच चांगला होता; परंतु हे काम करण्यास वाजवीपेक्षा जास्त कालापव्यय झाला होता. प्रजेस दिलेले आर्थिक साहाय्य सरकारी अधिकाऱ्यांच्या लाचखाऊ वृत्तीने वेळेवर मिळू शकले नाही. अशा रीतीने सुल-तानाची करवाढीची योजना अयशस्वी झाली.



**(२) आदर्श कृषी योजना (Ideal farm) :** मोहम्मदाने शेती विकास करण्या-साठी एक नवीन विभाग स्थापन केला होता. या विभागाचे नाव 'दीवाण-ए-कोही' असे होते. या विभागाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना प्रत्यक्षपणे सरकारी मदत देऊन जास्तीत-जास्त कृषीयोग्य जमीन लागवडीखाली आणण्याचा होता. सुमारे ६० चौरस मैल क्षेत्र-फळाची जागा प्रयोगादाखल या योजनेकरिता निश्चित करण्यात आली. या जमिनीवर निरनिराळी पिके काढण्याचे प्रयोग झाले. दोनच वर्षात सरकारने या योजनेवर ७० लक्ष टंकापेक्षा अधिक खर्च केला. ज्यांना जमिनीची फार गरज होती, अशा व्यक्तींनाच शेती करण्याकरिता ही जमीन देण्यात आली होती. दुर्दैवाने ही योजनाही अयशस्वी झाली. कारण, योजनेकरिता निवडण्यात आलेली जमीन नापीक निघाली तसेच सरकारी अधि-काऱ्यांनीही योजना खर्चाच्या रकमेत भ्रष्टाचार केला. प्रयोगाकरिता निश्चित करण्यात आलेला २-३ वर्षाचा कालावधी फार कमी होता. या वेळात निश्चित असे अनुमाने काढता येण्यासारखी नव्हती. धनाचाही विनियोग उचित प्रमाणात झाला नाही. त्यामुळे प्रयोग अयशस्वी झाल्यास नवल नव्हते.

**(३) राजधानी परिवर्तन (Change of Capital)** (इ. स. १३२६ १३२७) : मोहम्मदाच्या शासनव्यवस्थेतील दुसरी नाविन्यपूर्ण योजना दिल्लीहून राजधानी हलवून देवगिरी येथे नेण्याची होती. मोहम्मदाच्या राजधानी परिवर्तनाची अनेक कारणे देण्यात येतात. इब्न बतूताच्या उल्लेखाप्रमाणे दिल्लीतील लोकांनी सुलतानास अनेक निंदाव्यंजक पत्रे लिहिली होती. त्यांना शिक्षा करण्याकरिता त्याने राजधानी बदलण्याचा बेत आखला होता. जियाउद्दीन बर्नीच्या मतानुसार देवगिरी हे साम्राज्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने राज्यकारभारास सोयीचे होते. याशिवाय सतत होणाऱ्या मंगोल आक्रमणांपासून दिल्लीला नेहमीच धोका होता. शिवाय उत्तरेप्रमाणे दक्षिण भारतातही सत्ता विस्तार करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतला गेला.

या विविध कारणांनी प्रेरित होऊन सुलतानाने दिल्लीहून देवगिरीला राजधानी नेण्याचे ठरविले. देवगिरीचे नाव बदलून 'दौलताबाद' असे ठेवण्यात आले. मोहम्मदाने दिल्लीतील सर्व नागरिकांना दौलताबादेस जाण्याची आज्ञा केली. दिल्ली ते दौलताबाद या ५०० मैल लांबीच्या रस्त्यावर नागरिकांच्या सोयीकरिता सर्व प्रकारच्या सोयी पुरविण्यात आल्या. दिल्लीकर महत्प्रयासाने दौलताबादेस पोहोचले. परंतु या विशाल जनसमर्दाची तेथे सोय होणे शक्य नव्हते. ही गोष्ट मोहम्मदाच्या लक्षात येताच त्याने सर्व लोकांना पुन्हा दिल्लीस जाण्याची आज्ञा केली. या द्राविडी प्राणायामात जनतेचे अक्षरशः धिंडवडे निघाले. प्रवासात हजारो लोक मरण पावले. स्टॅन्ले लेनपूल लिहितो, "ही योजना सुलतानाच्या राजकीय शक्तीच्या दुरुपयोगाचे स्मारक आहे."

मोहम्मदाची राजधानी बदलण्याची आदर्श योजना अनेक कारणांनी फसली. देव-गिरी हे साम्राज्यातील मध्यवर्ती ठिकाण नव्हते. उत्तर भारतातील विरोधही कमी झाला नव्हता. परकीय आक्रमणाचा प्रतिकार देवगिरीहून करण्यासारखा नव्हता. राजधानी एका



Scanned with CamScanner

ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी सर्वच नागरिकांना हलविण्याची आवश्यकता नव्हती. केवळ सुलतान, सरकारी कार्यालये, अमीर-उमराव व सेवक वर्ग यांना तेथे नेल्याने त्याचा हेतू साध्य होऊ शकला असता. दिल्लीच्या रहिवाशांना राहते गाव सोडून दौलताबादेस जाण्याची इच्छा नव्हती. राजधानी बदलण्याच्या प्रयोगाचा साम्राज्य आणि जनतेवर फार वाईट परिणाम झाला. या योजनेमुळे त्याच्या प्रतिष्ठेला धक्का तर बसलाच, तसेच दिल्लीचे वैभवही नष्ट झाले.

**(४) प्रतीक मुद्रा प्रचलन** (Token Currency System) (इ.स. १३२९-३२): भारतीय नाणेशास्त्राच्या इतिहासात मोहम्मदाची कारकीर्द एक महत्त्वाचा टप्पा आहे. सुप्रसिद्ध मुद्राशास्त्रज्ञ एडवर्ड थॉमस लिहितो, "मुद्रानिर्मात्यांचा अग्रणी म्हणून मोहम्मदाचे नाव चिरस्थायी आहे. नाविन्य वैविध्य बनावट व कलात्मक दृष्टीने त्याची नाणी उत्तम आहेत. त्यातून सुलतानाचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होत आल्याने त्यांचे महत्त्व अधिक आहे." अलाउद्दीनाच्या मृत्यूनंतर राज्याची आर्थिक परिस्थिती बरीच ढासळली होती. त्यातच सुलतानाच्या वेगवेगळ्या राजकीय प्रयोगांचा ताण त्यांच्या खजिन्यावर झाला होता.

गार्डिनर ब्राउनच्या मताप्रमाणे, याकाळी जगातील सर्व भागातच चांदीचा तुटवडा पडला होता. सुलतानाने आपल्या दरबाऱ्यांकडून ऐकले होते की, चीनमध्ये तेथील राजा कुबलाईखानाने 'चांड' नावाची कागदी प्रतीक मुद्रा सुरू केली होती. चीन व इराणप्रमाणे येथेही नवीन प्रयोग करण्याची सुलतानाला इच्छा झाली. सुलतानाने नाण्यांच्या जडणघडणीत अनेक सुधारणा केल्या. त्याने 'दोकानी' नावाची नवी नाणी सुरू केली. तसेच दिनार नामक २०० ग्रेन वजनाचे सोन्याचे व १४४ ग्रेन वजनाचे चांदीचे नाणे सुरू केले. मोहम्मद तुघलकाच्या नाण्यांची जडणघडण, सुबकता व आकार इ. गोष्टी अत्यंत नाविन्यपूर्ण होत्या परंतु या सर्वांत प्रतीक मुद्रेच्या रूपाने तांब्याची नवी नाणी सुरू करण्याचा त्याचा प्रयोग अभिनव होता. त्याने तांबे-पितळेच्या धातूंची नवीन नाणी प्रचारात आणली प्रजाजनास अशी आज्ञा देण्यात आली की, त्यांनी सोन्याचांदीच्या नाण्यांऐवजी तांब्याच्या नाण्यांचा उपयोग दैनंदिन व्यवहारातील देवघेवीत करावा. परंतु सुलतानाने तांब्याच्या नाण्यांच्या उत्पादनावर अथवा राज्याच्या टाकसाळीवर नियंत्रण न ठेवण्याची मोठी घोडचूक केली. त्यामुळे कोणीही इसम नाण्याच्या आकाराचे धातूंचे तुकडे तयार करून त्यावर राजकीय टाकसाळीत राजमुद्रेचा ठसा घेऊन चलनाच्या रूपात या नाण्यांचा उपयोग करू शकत असे.

समकालीन इतिहासकार जियाउद्दीन बरनी लिहितो, "प्रत्येक हिंदुचे घर एक टाकसाळ झाले. बहुजनसमाजाने सोनेचांदी लपवून राज्य-कर देण्याकरिता याच नाण्यांचा उपयोग केला." मोहम्मदाच्या तांब्याच्या नवीन नाण्यांच्या प्रयोगाचा राज्याच्या आर्थिक स्थितीवर गंभीर परिणाम झाला. बाजारातून सोने-चांदी लुप्त झाले. व्यापारव्यवसायास जबर हानी पोहोचली. परदेशी व्यापारी तांब्याच्या नाण्यात देशी माल विकत घेत असत. परंतु आपला माल विकताना तांब्याची नाणी नाकारू लागले. राजमुद्रेचे अवमूल्यन झाले. सोन्याच्या एका टंकाची किंमत १०० तांब्याच्या नाण्यांबरोबर झाली. साम्राज्यात चोहोकडे अव्यवस्था व अराजकता निर्माण झाली होती. हे पाहून मोहम्मदाने आपली योजना



मागे घेतली. एक नवा वटहुकूम काढण्यात आला की, लोकांनी त्याच्याजवळ असलेली तांब्याची नाणी सरकारी खजिन्यात जमा करून मोबदल्यात सोन्याची नाणी न्यावीत. बहुजन समाजास ही आज्ञा एक महान पर्वणी होती. जियाउद्दीन बरनी लिहितो, "हजारो लोकांनी बदलण्याकरिता आणलेल्या नाण्यांचे तुघलकाबादमध्ये पर्वतप्राय ढीग लागले." दुर्दैववश मोहम्मदाची तिसरी अप्रतिम योजनादेखील फसली.

डॉ. ईश्वरीप्रसादांच्या मतानुसार, मोहम्मदाच्या नवी नाणी सुरू करण्याच्या कल्पनेचा जन्म रिक्त असलेला राजकोष भरून काढण्याकरिता झाला असे म्हणणे परिस्थितीस धरून होणार नाही. जर त्याच्याजवळ पैशांचा तुटवडा असता तर तांब्याच्या नाण्यांच्या मोबदल्यात सोन्याची नाणी देण्याची आज्ञा त्याने कधीच दिली नसती. या योजनेच्या अपयशाचा फार मोठा वाटा मोहम्मदाकडे येतो. त्याने वस्तुतः योजनेची अंमलबजावणी नीट केली नाही. मुद्रानिर्मितीवर राजाचे नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक होते. परिणाम असा झाला की, या योजनेने ग्रेशमचा अर्थशास्त्रीय सिद्धांत 'वाईट नाणी चांगल्या नाण्यास चलनातून अदृश्य करतात' हा १४ व्या शतकातच भारतात सिद्ध झाला.

**(५) खुरासान व चीनवरील स्वाऱ्या ?** (इ. स. १३३७-३८) : असे म्हणतात की, मोहम्मदास इराक, खुरासान व चीन हे देश जिंकण्याची अनिवार इच्छा होती. त्याच्या दरबारात असलेल्या काही खुरासानी अमीरांच्या विशेष आग्रहावरून सुलतानाने ३,७०,००० चे एक विशाल सैन्य जमविले. या सैन्यास एक वर्षाचा आगाऊ पगार देण्यात आला. परंतु पुढे काही कारणाने ही योजना बारगळण्यात आल्याने सैनिकांस दिलेला राज्याचा पैसा विनाकारण खर्च झाला! हिंदूबेग फरिश्ता असे लिहितो की, सुलतानाने चीन देश जिंकण्याचा प्रयत्न केला होता. परंतु इतर समकालीन लेखक या गोष्टीचे समर्थन करीत नाहीत. इ. स. १३३७ ते इ. स. १३३८ मध्ये मोहम्मदाने गढवाल-कुमाऊ भागातील कराजील या पहाडी प्रदेशातील हिंदू राजास महत्प्रयासाने पराजित करून आपला मांडलिक केले. पंजाबातील कांगडा जिल्ह्यातील नगरकोटचा किल्लाही सुलतानाने १३३७ मध्ये जिंकून घेतला.

**मंगोल धोरण :** मोहम्मदाच्या राजधानी परिवर्तनामुळे निर्माण झालेल्या धामधुमीचा फायदा घेऊन इ. स. १३२८-१३२९ मध्ये मंगोल नेता तरमा शिरीन याने मुलतान-लाहोर जिंकून दिल्लीवर चाल केली. सुलतानाने मंगोलांचा पराभव केला. फरिश्तासारखे काही लेखक असे लिहितात की, त्याने मंगोलांना द्रव्य देऊन परत पाठविले. परंतु खुद्द बर्नी व इब्न बतूता या समकालीन लेखकांनी अशा आक्रमणाचा उल्लेख केलेला नाही. असे म्हणतात की, तरमा शिरीनचा इराणी शासक इब्न सईदशी संघर्ष चालू होता. त्यात पराजित झाल्यामुळे तो भारतात आला व मोहम्मदानेही त्याला काही काळ आश्रय दिला व नंतर प्रवासखर्चासाठी रकम देऊन परत पाठविले. मात्र डॉ. ए. एल. श्रीवास्तव सुद्धा असे मानतात की, तरमा शिरीनला द्रव्य देऊन परतवून लावण्यात आले होते.

**मोहम्मदाचे धार्मिक धोरण :** मोहम्मद प्रवृत्तीने उदार व सहिष्णु होता. धर्मशास्त्राच्या अभ्यासाने त्याची बुद्धी प्रगल्भ झाली होती. जात्याच स्वतंत्र वृत्तीचा असल्याने



Scanned with CamScanner

मोहम्मदाचे मंगोल धोरण
मोहम्मदाचे धार्मिक धोरण
**मोहम्मदाचे प्रयोग अयशस्वी होण्याची कारणे–**

१. स्वाभाविक दोष
२. धार्मिक वर्गाचा असंतोष
३. योजना काळाच्या पुढे होत्या
४ अप्रामाणिक अधिकारी
५. प्रांतीय अधिकाऱ्यांची बंडखोर वृत्ती व साम्राज्यात दळणवळणाच्या साधनांचा अभाव
६. साम्राज्याचे विशालत्व
७. परदेशी मुसलमानाचा राज्यात प्रवेश

राज्यावर असलेला धर्माचा हानिकारक प्रभाव त्याला पसंत नव्हता. म्हणूनच त्याने उलेमा, शेख इ. लोकांचे राज्यकारभारातील दडपण समाप्त केले. मोहम्मदाने राज्यास धर्मनिरपेक्ष-धर्मातीत (Secular) करण्याचा स्तुत्य उपक्रम केला. धार्मिक वर्गास दिलेल्या सर्व सवलती त्याने रद्द केल्या. त्यांनी अपराध केल्यास तो कठोर दंड देत असे. हिंदूंशी त्याची वर्तणुक उदार होती. काही हिंदूंना त्याने उच्च पदांवर नेमले होते. उदा. भैरव (गुलबर्गा), धराधर (देवगिरी), रतन (सिंध) इ. त्याने हिंदूंचे बलात धर्मपरिवर्तन केले नाही. इतकेच नव्हे तर नगरकोट विजयानंतर त्याने ज्वालामुखीच्या देवालयाला उध्वस्त करण्याची परवानगी आपल्या सैनिकांना दिली नाही. व्यक्तिगतरीत्या तो अतिशय धार्मिक वृत्तीचा होता. त्याच्या नाण्यांवर 'सुलतान ईश्वराची छाया आहे, अथवा 'ईश्वर सुलतानाचा हितैषी आहे.' इ. लेख छापलेले होते. मोहम्मदाचा राजाच्या दैवी अधिकाराच्या सिद्धांतावर विश्वास होता. थोडक्यात, मोहम्मदाचे धर्मविषयक विचार कर्मठ आणि सनातनी वृत्तीच्या उलेमा वर्गास असंमत होते त्यामुळे उलेमा वर्गाने सुलतानास प्रखर विरोध करून त्याच्याविरुद्ध प्रचाराची मोहीम उघडली. परिणाम असा झाला की, प्रजेने निरनिराळ्या ठिकाणी उपद्रवास आरंभ केला. हे सर्व आपल्या धार्मिक नीतीचे दुष्परिणाम आहेत असे समजून मोहम्मदाने तत्काळ आपले धोरण बदलले. त्याने बंडखोर ओलेमा वर्गास पुन: मानाच्या जागा व अधिकार दिले. आपली प्रतिष्ठा पुन: प्राप्त करण्याकरिता त्याने इजिप्तच्या फातिमाईद वंशाच्या दरिद्री खलिफाला दिल्लीला बोलावून त्याच्याकडून आशीर्वाद व मानपत्र घेण्याचे नाटक सुद्धा केले, परंतु या सर्व गोष्टींनी निष्पन्न काहीच झाले नाही; परिस्थिती अधिकच चिघळली.

**मोहम्मदाचे प्रयोग अयशस्वी होण्याची कारणे :** मोहम्मदाच्या संपूर्ण कारकीर्दीचे अवलोकन केल्यास असे आढळून येते की, त्याची कारकीर्द ही त्यास मिळालेल्या अपयशाची एक करुण कहाणीच आहे. यासंबंधी रियासतकार श्री. सरदेसाई असे लिहितात की, "त्याच्या कारकीर्दीचा इतिहास म्हणजे त्याच्या चुकांचेच वर्णन होय. पित्याकडून त्यास विशाल साम्राज्याचा वारसा मिळाला. परंतु त्याच्या मृत्यूसमयी मात्र हे साम्राज्य नाममात्र राहिले होते" त्याच्या अपयशास खालील कारणे जबाबदार होती–

**(१) स्वाभाविक दोष :** काही विद्वानाच्या मते, या अपयशास सुलतान स्वत.च बऱ्याच अंशी जबाबदार होता. मोहम्मदात समजूतदारपणा, व्यावहारिक बुद्धी व माण-



सांची पारख करण्याची कला नव्हती. तो विलक्षण हट्टी व हेकेखोर होता. स्वभावाने तो अतिशय कठोर व उतावळ्या वृत्तीचा होता. या विविध स्वाभाविक दोषांमुळे तो अयशस्वी झाला होता.

**(२) धार्मिक वर्गाचा असंतोष :** मोहम्मदाने उलेमा वर्गाचे राज्यकारभारातील प्राबल्य समाप्त केले. त्यांच्या अपराधास तो कठोर शिक्षा देऊ लागला. धर्मगुरूंच्या अनादराने मुसलमानी प्रजा असंतुष्ट झाली. परिणामस्वरूप त्यास आपले धोरण बदलावे लागले. हे धोरण बदलल्यामुळे त्याची प्रतिष्ठा निश्चितच कमी झाली.

**(३) योजना काळाच्या पुढे होत्या :** सुलतानाच्या योजना–राजधानीपरिवर्तन, प्रतीक-मुद्रा–प्रचलन-समकालीन काळाच्या फार पुढे होत्या. या योजना सर्वसाधारण माणसांच्या आकलनशक्तीच्या बाहेर असल्याने त्यामागील मूळ उद्देश प्रजेच्या गळी उतरविण्याचे कार्य मोहम्मदास साधले नाही. त्याचा चांगला हेतू प्रजा समजू शकली नाही. योजना यशस्वी करण्यामध्ये मदत करण्याऐवजी प्रजेने सुलतानाशी उघड असहकार पुकारला. मोहम्मदात सहनशक्ती मुळीच नव्हती. त्याने विरोधकांना कठोर शिक्षा द्यावयास सुरुवात केली. त्याबरोबरच प्रजेच्या सहकार्यास तो पूर्णपणे मुकला. त्याची प्रजा त्याचा तिरस्कार करू लागली.

**(४) अप्रामाणिक अधिकारी :** दुर्दैवाने मोहम्मदास योग्य सल्ला देणारे, त्याच्या काल्पनिक योजनांपासून त्याला परावृत्त करणारे व संकटात मदतीचा हात देणारे विश्वासू आणि प्रामाणिक अधिकारी मिळाले नाहीत. याउलट, त्याच्या लाचलुचपतखोर अधिकाऱ्यांनी त्याच्या योजनांचा गैरफायदा घेऊन प्रजेची पिळवणूकच केली असे दिसते.

**(५) प्रांतीय अधिकाऱ्यांची बंडखोर वृत्ती व साम्राज्यात दळणवळणाच्या साधनांचा अभाव :** मोहम्मदाचे साम्राज्य फार विशाल होते. संपूर्ण भारत त्याच्या अमलाखाली होता. त्याच्या अयशस्वी प्रयोगांनी साम्राज्यात बेबंदशाही व अराजकता वाढली. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन दूरदूरच्या प्रांतीय सुभेदारांनी बंडे केली. दळणवळणाच्या साधनांच्या अभावी या बंडाचे द्रुतगतीने दमन करण्यास सुलतान असमर्थ ठरला.

**(६) साम्राज्याचे विशालत्व :** मोहम्मदाचे साम्राज्य भारतातील विशाल प्रदेशात पसरलेले होते. दळणवळणाच्या द्रुतगामी साधनांच्या अभावी या अफाट साम्राज्यावर नियंत्रण ठेवण्यात सुलतान अपयशी ठरला तर त्यात काही आश्चर्य नव्हते.

**(७) परदेशी मुसलमानांचा राज्यात प्रवेश :** परदेशातून आलेल्या मुसलमानांवर सुलतानाचा फार विश्वास होता. त्याच्या दरबारी इराण, अरबस्थान, ॲबिसिनिया, तुर्कस्थान, अफगाणिस्थान व खुरासान इ. दूरदूरच्या प्रदेशातून बरेच मुलमान लोक नशीब काढण्याच्या उद्देशाने आले होते. स्वदेशी मुसलमानांपेक्षा सुलतानाची मर्जी या बाहेरून आलेल्या मुसलमानांवर जास्त होती. त्याने या लोकांनां लष्करात व राज्यव्यवस्थेत मोठमोठ्या जागा दिल्या होत्या. परंतु हे लोक स्वामिभक्त नसल्याने सुलतान पेचात पडला आहे असे पाहून त्यांनी बंड केले.



Scanned with CamScanner

## मोहम्मद तुघलकावर इतिहासकारांनी केलेले आरोप

समकालीन लेखक इब्न बतूता आणि जियाउद्दीन बरनी यांच्या परस्परविरोधी वर्णनावरून आधुनिक इतिहासकारांनी मोहम्मद तुघलकावर वेडा, रक्तपिपासू, परस्पर-विरोधी गुणांचा पुतळा, स्वप्नाळू, नास्तिक व आदर्शवादी इ. नानातऱ्हेचे आरोप केलेले आहेत. येथे आपण या विविध आरोपांचा थोडक्यात विचार करू.

**(१) मोहम्मद वेडा होता का ?** : मोहम्मदाच्या चरित्रात परस्परविरोधी गुणांचे आश्चर्यकारक संमिश्रण झाले होते. स्वभावाने तो उदार व दानशूर होता. तसेच नरसंहाराची प्रवृत्तीही त्यात भरपूर प्रमाणात होती. त्याच्याकडे येणाऱ्या लोकांना तो मुक्तहस्ताने देणग्या देत असे. तर काहींना तो जबर शिक्षा ठोठावून त्यांची मृत शरीरे राजमहालाबाहेर फेकीत असे. तो अतिशय न्यायप्रिय होता. परंतु त्यांचे दंडविधान अत्यंत कठोर होते. व्यक्तिश: जरी तो धार्मिक वृत्तीचा असला तरी अन्य सुलतानात असलेल्या धार्मिक कट्टरतेचा त्याच्या ठिकाणी अभाव होता. म्हणूनच बरनी त्यास "ईश्वराने निर्मिलेला अद्भुत प्राणी" म्हणतो तर एल्फिन्स्टन त्यास "काही अंशी वेडा मानतो." डॉ. ईश्वरीप्रसाद लिहितात, "खाजगी जीवनात सुलतान वेडा नव्हता. परंतु त्याच्या राजकीय वेडेपणासंबंधी इतिहासाचा जो निर्णय आहे त्याचे खंडन करता येत नाही".

**(२) रक्तपिपासूपणा** : मोहम्मद जात्याच हट्टी, रागीट व उग्र प्रकृतीचा होता. शिस्तीचा तो विलक्षण भोक्ता होता. लोकांनी आपल्या आज्ञा पाळाव्या अशी त्याची अपेक्षा होती. राजाज्ञांचे उल्लंघन त्यास असहनीय होते अगदी लहानसहान अथवा क्षुल्लक अपराधांकरिताही तो सारासारविवेकबुद्धीचा त्याग करून अत्यंत कठोर शिक्षा करी. मोरोक्कन प्रवासी इब्न बतुता आपल्या प्रवास वर्णनात लिहितो की, "मोहम्मद तुघलकाप्रमाणे दुष्ट आणि रक्तपिपासू मनुष्य सृष्टीच्या प्रारंभापासून अद्यापपर्यंत कोणीही झाला नसेल ... एकही दिवस असा जात नसे की, ज्या दिवशी कोणाचा वध झाला नाही अथवा राजमहालाच्या प्रवेशद्वारावर रक्ताची नदी प्रवाहित झाली नाही. कदाचित याच वर्णनावरून इतिहासकार एल्फिन्स्टनने मोहम्मदावर वेडेपणाचा आरोप लावला असावा. परंतु मोहम्मदाचे चरित्र लेखक डॉ. ईश्वरी प्रसाद यांना मोहम्मदावर लावलेले "वेडेपणा" किंवा "रक्तपिपासूपणा" हे आरोप मान्य नाहीत. त्यांच्या मतानुसार मोहम्मदावर लावलेले हे आरोप निश्चित निराधार आहेत. कारण की, कोणाही समकालीन लेखकाने मोहम्मदावर वेडेपणाचा आरोप केलेला नाही. तो लहानसहान अपराधांकरिता मृत्युदंडाची शिक्षा देई. फार झाले तर असे म्हणता येईल की, त्याच्यात बुद्धीचा समतोलपणा नव्हता. गुन्ह्याच्या स्वरूपानुसार तो शिक्षा देत नसे. याशिवाय मध्यकाळात युरोप आणि आशिया खंडामध्ये सर्वत्रच अपराधांकरिता अत्यंत कठोर शिक्षा देण्याची पद्धत प्रचलित होती.

> **मोहम्मद तुघलकावर इतिहासकारांनी केलेले आरोप–**
>
> १. मोहम्मद वेडा होता का ?
> २. रक्तपिपासूपणा
> ३. नास्तिकता
> ४. स्वप्नाळूपणा अथवा आदर्शवादी
> ५. परस्परविरोधी गुणांचा पुतळा,
> अंतर्गत बंडे
>
> मोहम्मदाचा मृत्यू
> योग्यता

**(३) नास्तिकता** : मोहम्मदाची संपूर्ण कारकीर्द स्वत: डोळ्याने पाहणारा त्याचा समकालीन चरित्रकार जियाउद्दीन बरनी "तारीख ए फिरोजशाही" मध्ये असा उल्लेख करतो की, त्यास इस्लामबद्दल आकर्षण राहिले नव्हते. त्याचे आचरण इस्लामविरोधी होते. परंतु इब्न बतूता मात्र बरनीच्या उल्लेखाविरुद्ध माहिती देताना असे लिहितो की, सुलतान नमाज व धार्मिक कृत्यांच्या बाबतीत अत्यंत जागरूक होता, धर्माज्ञांचे पालन तो स्वत: तर करीच पण इतरांकडूनही करवून घेई. नमाजाच्या वेळी रस्त्यात भेटणाऱ्या मुसलमानांस शिक्षा केली जाई. सुलतानाची अशी आज्ञा होती की, लोकांनी धर्माच्या आज्ञा पाठ कराव्यात गादीवर बसल्यानंतर प्रारंभी त्याने आपल्या परधर्मी प्रजेकरिता जरी सहिष्णु वृत्तीचा अवलंब केला तरी व्यक्तिगतरीत्या त्याने इस्लामचा त्याग कधीही केला नव्हता. मोहम्मदावर नास्तिकतेचा आरोप उलेमावर्गाने या कारणांनी केला आहे की त्याने राज्यकारभारातून त्यांचे उच्चाटन केले होते. इतकेच नव्हे तर, उलेमावर्गाच्याही साधारण अपराधांकरिता सुद्धा तो अन्य लोकांप्रमाणे त्यांना कठोर शिक्षा ठोठावीत असे. म्हणूनच मोहम्मदाने धार्मिक वर्गाचा तीव्र असंतोष आपल्यावर ओढवून घेतला, वस्तुस्थिती पाहता असे आढळून येईल की, या आरोपात काहीच तथ्य नाही.

**(४) स्वप्नाळूपणा अथवा आदर्शवादी** : मोहम्मदावर करण्यात येणाऱ्या या आरोपात बराच तथ्यांश दिसतो. कारण त्याला हवेत किल्ले बांधण्याची आणि प्रत्यक्ष व्यवहारात अयशस्वी होणाऱ्या योजना लागोपाठ अमलात आणण्याची त्यास विलक्षण हौस होती असे दिसते. मोहम्मद तुघलक "अचाट कल्पनांचा" महापुरुष होता नाविन्याचा तो भोक्ता होता. निरनिराळे प्रयोग करण्याचे जणू काही त्यास वेडच होते. त्याच्या काही योजना उदा. प्रतीक मुद्राप्रचलन आणि राजधानीपरिवर्तन या निश्चित त्याच्या राजकीय दूरदृष्टीच्या द्योतक होत्या. परंतु या योजनांची अंमलबजावणी नीट न झाल्याने त्या व्यवहारात फुसक्या ठरल्यामुळे सुलतानाची अप्रतिष्ठा होऊन तो आदर्शवादी अथवा कल्पनासृष्टीत वावरणारा होता हे सिद्ध झाले.

**(५) परस्परविरोधी गुणांचा पुतळा** (Mixture of opposites) : मोहम्मदाचे व्यक्तिमत्त्व खरोखरच अत्यंत अद्भुत होते. त्यात प्रतिभासंपन्नतेबरोबर व्यावहारिक मूर्खपणा, आदर्शवादाबरोबर निर्दयता, औदार्याबरोबर पाशवीवृत्ती, आस्तिकतेबरोबर नास्तिकतेचे गूढ मिश्रण होते म्हणूनच बरेचसे इतिहासकार मोहंम्मदास "परस्परविरोधी गुणांचा पुतळा" मानतात. त्याचे विद्वान चरित्र लेखक डॉ. ईश्वरीप्रसाद असे मत प्रकट करतात की, "वरवर पाहता असे दिसून येईल की, मोहम्मद तुघलकात परस्परविरोधी तत्त्वांचे मिश्रण होते. परंतु चिकित्सकवृत्तीने विचार केल्यास ही धारणा निराधार आहे हे सिद्ध होईल. सत्य हे आहे की, मोहम्मदाने आपल्या स्वभावातील दोष आणि प्रशा-

सकीय सुधारणा करण्यापूर्वीच्या आदर्शाची उपेक्षा केली. जेव्हा लोकांनी त्याच्या इच्छेनुसार कार्य करण्यास असमर्थता प्रकट केली, तेव्हा त्याच्या क्रोधास पारावार उरला नाही. त्याची असंतुष्टता लोकांच्या औदासिन्याचा परिणाम होती."

मोहम्मदाचे दुसरे प्रसिद्ध चरित्रकार डॉ. आगा मेहदी हुसेन यांना मोहम्मदावरील हा आरोप अमान्य आहे. या आरोपाचे निराकरण करताना ते असे मत प्रकट करतात की, "मोहम्मदात जरी परस्परविरोधी गुण असले तरी ते त्याच्या आयुष्यातील भिन्न-भिन्न काळात निरनिराळ्या कारणांमुळे प्रकट झालेले होते." आपल्या मतांच्या समर्थनार्थ ते हे स्पष्ट करतात की, मध्यकालीन सुलतानात तो सर्वाधिक विद्वान व प्रतिभाशाली होता. त्याच्या योजना मूर्खपणाच्या नव्हे तर कुशाग्रबुद्धी व व्यापक दृष्टिकोनाच्या परिचायक होत्या. या योजनांमागील त्याचे विचार किंवा सिद्धांत चुकीचे नव्हते. त्याचे अपयश त्याच्या अधिकाऱ्यांच्या अयोग्यतेमुळे व प्रजेच्या असहकारामुळे निर्माण झाले होते. आपल्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचा त्याचा प्रयत्न परिस्थिती अनुकूल असती, अधिकारी प्रामाणिक असते व प्रजेने सहकार्य दिले असते तर अवश्य यशस्वी झाला असता. सुलतान उदार व दानशूर होता; पण अपराधी व कर्तव्यभ्रष्ट लोकांस कठोर शिक्षा करण्यात तो मागेपुढे पाहत नसे. रक्तपिपासूपणा त्याच्या वृत्तीत नव्हता. प्राय: असे दिसते. की, ज्यांना त्याने उच्चासनावर बसविले त्यांनीच त्याचे सर्वस्व नष्ट करण्याचा चंग बांधल्यामुळे वैतागून, भ्रमिष्टावस्थेत सुलतान वाटेल त्यास मृत्युदंड देऊ लागला. त्याची सारासारविवेकबुद्धी नष्ट झाली, चोहोकडे त्यास शत्रूच-शत्रू दिसू लागले.

व्यक्तिश: सुलतान धार्मिक प्रवृत्तीचा होता. पण बहुसंख्य प्रजेकरिता त्याने सहिष्णुवृत्तीचा अवलंब केला. तो धर्मभ्रष्ट, अप्रामाणिक व जुलमी अधिकाऱ्यास तसेच सरदार आणि उलेमा वर्गास कडक शिक्षा करी. त्याची न्यायप्रियता इतकी जाज्वल्य होती की, स्वत:च्या हातून एखादे वेळी अपराध घडल्यास सामान्य गुन्हेगाराप्रमाणे सुलतानही न्यायालयात उपस्थित होऊन न्यायाधीशाने दिलेला निर्णय मुकाट्याने मान्य करी, एकंदरीत काही लोकांचा अपवाद सोडल्यास बऱ्याच इतिहासकारांचा कल त्यास परस्परविरुद्ध गुणांचा पुतळा मानण्याकडे दिसतो.

**अंतर्गत बंडे (इ. स. १३३५ ते १३५१) :** मोहम्मद तुघलकाच्या कारकीर्दीची शेवटची १६ वर्षे अतिशय कष्टदायक होती. त्याच्या योजना अयशस्वी झाल्याने लोक त्याच्याविरुद्ध प्रक्षुब्ध झाले होते. प्रजेने व सरदारांनी ठिकठिकाणी बंडे करून साम्राज्याचे तुकडे पाडण्यास सुरुवात केली. या बंडाचे निर्मूलन करण्यातच मोहम्मदाचा अंत झाला.

(१) सर्वप्रथम इ. स. १३३५ मध्ये मथुरेचा राज्यपाल एहसानशहाने बंड केले. या बंडाचा मोड सुलतानाला करता आला नाही. एहसानशहा स्वतंत्र झाला.

(२) सुलतानाच्या मृत्यूची अफवा ऐकून दौलताबादचा राज्यपाल हुसेनशहाने बंड केले. मोहम्मदाने त्याचा पाडाव करून त्यास क्षमा केली.

(३) पूर्व बंगालमध्ये सुलतान बहरामचा वध करून सत्ता हस्तगत करणारा फखरूद्दीन हा इ. स. १३३७ मध्ये स्वतंत्र झाला.



(४) सुलतानाचा विश्वासू सरदार आणि अवधचा सुभेदार ऐनुलमुल्क मुलतानी याने दक्षिणेत जाऊन बंड केले. मोहम्मदाने या बंडाचा मोड केला. परंतु त्याचे पूर्वीचे कार्य लक्षात घेऊन सुलतानाने त्यास उदार अंत:करणाने सोडून दिले.

(५) मुलतानमध्ये मलिकशहा लोदीने तेथील सुभेदारास अटक करून स्वत:स स्वतंत्र शासक घोषित केले; परंतु नंतर त्याने सुलतानाकडे क्षमायाचना केली.

(६ इ. स. १३३६ मध्ये दक्षिणेतील हिंदूंनी हरिहर व बुक्कराय यांच्या नेतृत्वात विजयनगराच्या स्वतंत्र हिंदु राज्याची स्थापना केली.

(७) इ. स. १३४३ मध्ये वारंगळचा काकतीयवंशी राजपुत्र कृष्णा नायकाच्या नेतृत्वात एक मुसलमान विरोधी मोर्चा दक्षिणेत तयार झाला. कृष्णा नायकाने वारंगळ, द्वारसमुद्र आणि कारोमांडेल समुद्रतटावरील सर्व प्रदेश मुसलमानी अमलाखालून मुक्त केले.

(८) दक्षिण भारतातील दौलताबाद व गुलबर्ग्याच्या प्रदेशात अनेक परकीय मुसलमानांना जहागिऱ्या देण्यात आल्या होत्या. त्यांनी हसन गंगूच्या नेतृत्वाखाली इ. स. १३४७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना केली.

**मोहम्मदाचा मृत्यू (२० मार्च १३५१) :** मोहम्मदाच्या कारकिर्दीतील शेवटच्या धामधुमीच्या काळात गुजराथच्या राज्यपालाने बंड केले. सुलतानाने गुजराथेत जाऊन त्याचा पराभव केला. तेव्हा तो सिंधमध्ये पळून गेला. सुलतान पाठलाग करीत तेथे गेला. परंतु त्याची फार फजिती झाली. अनेक वर्षांच्या दगदगीने सुलतान थकला होता. २० मार्च इ. स १३५१ रोजी तो सिंधमध्ये ठठ्ठा येथे मरण पावला अशा रीतीने इतिहासकार बदायूनीच्या शब्दात, "सुलतानाला त्याच्या प्रजेपासून व प्रजेला सुलतानापासून कायमची मुक्ती मिळाली."

**योग्यता :** मोहम्मद तुघलकाइतकी विवादास्पद व्यक्ती मध्यकालीन भारतीय इतिहासात दुसरी झाली नसेल. मोहम्मदावरील इतिहासकारांनी भिन्नभिन्न मते व्यक्त केली आहेत. काही आंग्लइतिहासकारांनी त्याच्यावर वेडेपणाचा आरोप ठेवला आहे. इतर इतिहासकार त्यास 'सैतानाचा अवतार', 'दुर्दैवी आदर्शवादी', 'आपल्या युगाचा ॲरिस्टॉटल', 'मुद्रानिर्मात्यांचा अग्रणी' व 'प्रतिभाशाली शासक' इ. विशेषणे देतात.

व्यक्तिश: मोहम्मद सर्वगुणसंपन्न होता कुशाग्रबुद्धी, अचाट स्मरणशक्ती व ज्ञानपिपासा हे त्याचे विशेष गुण होते. विविध शास्त्रात तो पारंगत होता मध्यकालीन भारतीय इतिहासातील तो एक निर्व्यसनी सुलतान होता दातृत्वाकरिता तो फार प्रख्यात होता. नीतिमत्तेची त्यास विशेष चाड होती. इस्लामावर त्याची श्रद्धा होती. परंतु धर्माच्या कट्टर आज्ञा त्याला मान्य नव्हत्या. परधर्मी प्रजेशी सहिष्णुतेने वागणारा तो दिल्लीचा पहिला सुलतान होता.

आदर्श राज्यकर्ता या नात्याने मोहम्मद अयशस्वी ठरला. त्याच्या हयातीतच त्याचे साम्राज्य नष्ट होऊ लागले होते. शासनव्यवस्थेतील त्याचे अपूर्व प्रयोग त्याच्या स्वप्नाळू आणि असंतुलित स्वभावामुळे अयशस्वी झाले. त्याच्या योजना कागदावर उत्कृष्ट होत्या,



Scanned with CamScanner

परंतु प्रत्यक्ष व्यवहारात त्या फुसक्या ठरल्या. डॉ. ईश्वरीप्रसाद यांच्या मते, 'त्याचे दुर्भाग्यच त्याच्या अपयशाचे कारण होते आणि म्हणूनच त्यास दुर्दैवी शासक म्हटले पाहिजे.' मोहम्मदाच्या अपयशाची चिकित्सा करताना काही लेखक असे लिहितात की, तत्कालीन परिस्थिती त्याच्याविरुद्ध होती. तो काळाच्या फार पुढे गेलेला होता. परंतु या मतात तथ्यांश कमी वाटतो. कारण परिस्थितीवर मात करणारे शासकच यशस्वी व महान सुलतान होतात. स्वाभाविक दोषांमुळे मोहम्मदात याच गोष्टीचा अभाव होता. सुलतानपद प्राप्त करण्यापूर्वी मोहम्मदाने कुशल योद्धा व चतुर सेनानायक म्हणून कीर्ती संपादन केली होती; परंतु त्याच्या कारकीर्दीतील अखेरची बंडे मोडण्यात तो दुर्दैवाने अयशस्वी झाला होता.

इब्न बतूता : मोहम्मद तुघलकाच्या कारकीर्दीची विश्वसनीय माहिती त्याच्या किताब-उल-राहला या प्रवासवर्णन ग्रंथावरून मिळते. त्याचे नाव अबू अब्दुल्ला मोहम्मद असले तरी तो इब्न बतूता या नावानेच प्रसिद्ध आहे. त्याचा जन्म मोरोक्कोतील तंजा येथे २४ फेब्रु. १३०४ ला झाला होता. प्रवासाची आवड असल्यामुळे वयाच्या २१ व्या वर्षी तो प्रवासाला बाहेर पडला. आफ्रिका व आशियातील वेगवेगळ्या देशांमधून प्रवास करीत करीत हिंदुकुश पर्वताच्या मार्गाने तो भारतात पोहोचला. त्याची विद्वत्ता पाहून सुलतान मोहम्मद तुघलकाने त्याला दिल्लीचा काजी म्हणून नेमले. या पदावर त्याने ८ वर्षेपर्यंत (इ. स. १३३४ ते १३४२) कार्य केले. मोहम्मद तुघलकाने त्याला चीनमध्ये राजदूत नियुक्त केले. जावा-सुमात्रा मार्गे तो चीनला गेला. इ.स. १३४९ मध्ये तो मोरोक्कोला परत गेला. तेथे वयाच्या ७३ वर्षी इ. स. १३७७–७८ मध्ये तो फेझ येथे मरण पावला.

त्याने सुलतान मोहम्मद तुघलकाच्या राज्यकारभाराचे फसलेले विविध राजकीय प्रयोग, तत्कालीन महत्त्वाच्या घटना, भारतीय लोक, त्यांचे आचारविचार यांच्याबद्दल सविस्तर वर्णन केलेले आहे सुलतानाच्या अनेक योजना व धोरणांवर त्याने निस्पृहपणे टीका केलेली आहे.